सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००

फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : सीएमए-०४२१/सीआर-०१/२०२१/जाहिरात दिनांक : २९ डिसेंबर, २०२१

**-: प्रसिद्धीपत्रक :-**

**विषय:- राज्य सेवा पूर्व परीक्षा २०२१ - परीक्षेच्या आयोजनाबाबत**

राज्य शासनाच्या सेवेतील विविध संवर्गातील पदभरतीकरीता दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरून विषयांकित राज्य सेवा पूर्व परीक्षा २०२१, रविवार, दिनांक ०२ जानेवारी, २०२२ रोजी घेण्याचे नियोजित होते. त्यानुसार आयोगाकडून परीक्षेच्या आयोजनासंदर्भात संपूर्ण तयारी करण्यात आली होती. तथापि, कोव्हिडच्या पार्श्वभूमीवर शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.६१/कार्या-१२, दिनांक १७ डिसेंबर, २०२१ अन्वये दिनांक १ मार्च, २०२० ते १७ डिसेंबर, २०२१ या कालावधीत कमाल वयोमर्यादा ओलांडली आहे, अशा उमेदवारांना 'एक वेळची विशेष बाब' म्हणून अर्ज सादर करण्याची संधी देण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आला. तसेच, शासन निर्णयाच्या दिनांकापूर्वी अर्ज सादर करण्याची मुदत संपलेल्या तथापि, प्रत्यक्ष परीक्षेचे आयोजन करण्यात आलेले नाही, अशा परीक्षांकरीताही सदर संधीचा निर्णय लागू करण्यात आला आहे.

२. राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२१ च्या आयोजनासंदर्भातील सर्व कार्यवाही प्रस्तुत शासन निर्णयाच्या दिनांकापूर्वी पूर्ण झालेली असल्याने परीक्षेच्या आयोजनाचा दिनांक न बदलता शासन निर्णयातील तरतुदीची अंमलबजावणी करावयाची झाल्यास नव्याने पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना अर्ज सादर करण्यास द्यावा लागणारा कालावधी, नव्याने अर्ज केलेल्या उमेदवारांची संख्या निश्चिती झाल्यानंतर सदर उमेदवारांकरीता नव्याने परीक्षा केंद्र निश्चिती, पर्यवेक्षकीय कर्मचाऱ्यांच्या नेमणुका, प्रश्नपुस्तिका व उत्तरपत्रिका यांची छपाई करणे, प्रश्नपुस्तिका व उत्तरपत्रिका जिल्हाकेंद्रावर पोहोच करणे, कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर निर्जंतुकीकरण व तत्सम व्यवस्था करणे इत्यादी स्वरुपाची तांत्रिक कार्यवाही अल्पकालावधीत करावी लागणार होती. सदर कार्यवाहीमध्ये आयोगाच्या कार्यालयासह सर्व जिल्हाधिकारी कार्यालये, पर्यवेक्षकीय कर्मचा-यांची सेवा पुरविणारी शासकीय कार्यालये, शाळा/ महाविद्यालये, पोस्ट खाते, सेवा पुरवठादार संस्था इत्यादी वेगवेगळ्या शासकीय/निमशासकीय/खाजगी यंत्रणांचा सक्रिय सहभाग आवश्यक असतो व परिपूर्णतेसाठी सदर सर्व यंत्रणांना किमान कालावधी उपलब्ध करुन देणे आवश्यक ठरते. शासन निर्णयातील तरतुदीची अंमलबजावणी न केल्यास विहित कालावधीत वयाधिक ठरणाऱ्या उमेदवारांना शासनाने 'एकवेळची विशेष बाब' म्हणून संधी देऊनही आयोगाकडून त्याची अंमलबजावणी केली गेली नाही, या कारणास्तव न्यायालयीन प्रकरणे व तक्रारी उद्भवून प्रस्तुत परीक्षेद्वारे केल्या जाणाऱ्या भरतीप्रक्रियेमध्ये अडथळे निर्माण होण्याची शक्यता राहते.

३. उपरोक्त सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन शासन निर्णयाद्वारे विहित कालावधीत वयाधिक ठरणाऱ्या उमेदवारांचे होणारे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी व नव्याने पात्र ठरलेल्या उमेदवारांसह परीक्षा आयोजनाकरीता आयोगास किमान कालावधी उपलब्ध व्हावा, यासाठी दिनांक ०२ जानेवारी, २०२२ रोजी नियोजित परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

४. सदर परीक्षेच्या आयोजनास लागणारा कालावधी, आयोगाकडून २०२२ मध्ये आयोजित परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक, संघ लोकसेवा आयोगासह इतर परीक्षा मंडळे यांच्याकडून नजिकच्या काळात आयोजित करण्यात येणाऱ्या परीक्षा इत्यादी बाबी विचारात घेऊन लवकरात लवकर परीक्षेचे आयोजन करण्यात येईल.

सहसचिव, जाहिरात

ठिकाण:मुंबई महाराष्ट्र लोकसेवा आयोग